<u>नि.फौ.ख.क्र.१२९/२०२२</u>
शासन–वि–योगेश पवार
**नि.क्र.२९.**

**अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र.३ यांची जबानी**

मी याद्वारे सत्य प्रतिज्ञेवर कथन करतो की,

| | | |
|---|---|---|
| नाव | – | दिपक दगडु यादव, |
| वय | – | ३६ वर्षे, |
| व्यवसाय | – | पोलीस कॉन्स्टेबल ब.क. २४९१, |
| राहणार | – | ऊरुळीकांचन पोलीस स्टेशन, जि. पुणे. |

**सरतपासणी अभियोग पक्षातर्फे विद्वान सहा. सरकारी अभियोक्ता श्री. के. के. कौलवार यांच्यामार्फत शपथेवर सुरुः–**

१. घटना दिनांक १४.०४.२०२१ रोजी भांडगाव फाटा, शिवनेरी हॉटेलसमोर, पुणे–सोलापुर हायवेला, ता. दौंड, जि. पुणे येथे सकाळी ०६.०० वा. घडली होती. सदर दिवशी पोलीस निरीक्षक पाटील साहेबांनी अवैध कायदा वाळु वाहतुकी संदर्भाने कारवाई करण्याचे तोंडी आदेश दिले होते. त्यानुसार मी, पोलीस नाईक तारळकर व पोलीस कॉन्टेबल लगड असे आम्ही शिवनेरी हॉटेलसमोर उभे असताना सोलापुर बाजुने पुणे बाजुकडे भगव्या रंगाचा एक ट्रक नं. एमएच–१२–केपी–२०२० दिसला. सदर वाहनाचा संशय आल्याने त्याला ईशारा करुन बाजुला घेण्यास सांगितले होते. त्या ट्रकच्या हौद्यात ३ ब्रास वाळु दिसुन आली होती. त्या ट्रक चालकाचे नाव योगेश सुभाष पवार असे होते. त्या चालकाकडे वाळुच्या परवान्याबाबत चौकशी केली असता परवाना नसल्याचे सांगितले. वाहनाबाबत चौकशी केली असता त्याने सांगितले की, सदरचे वाहन त्याने नामदेव पवार याच्याकडुन नोटरी करुन चालविण्यास घेतली आहे. कॉन्स्टेबल तारळकर यांनी दोन पंचासमक्ष त्या ट्रकचा पंचनामा केला होता. नंतर पोलीस स्टेशनला येऊन मी सरकारतर्फे त्या घटनेबाबत फिर्याद दिली. आता मला दाखविण्यात आलेली निशाणी क्र.२१ वरील फिर्याद तीच आहे. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर

आहे. आरोपीला पाहिल्यास ओळखु शकतो.

**<u>सरतपास पुर्ण.</u>**

**<u>सदर साक्षीदाराचा उलटतपास आरोपीतर्फे विद्वान विधीज्ञ श्री. व्ही. ए. माने यांच्यामार्फतः–</u>**

२. कारवाईकरिता जाण्यापुर्वी स्टेशन डायरीला नोंद केल्याचे मला आठवत नाही. हे म्हणणे खरे नाही की, माझी आणि सहका–यांची ड्युटीची वेळ सांगता येत नाही. साक्षीदार म्हणतो, आम्ही नाईट ड्युटीला असुन रात्री ०९.०० ते सकाळी ०९.०० वाजेपर्यंत ड्युटी असते. मी आरोपीकडे गाडीच्या मालकीच्या पेपर्सबाबत चौकशी केली नाही. हे म्हणणे खरे आहे की, मी आरोपीला प्रत्यक्षात वाळु उत्खनन करताना पाहिलेले नाही. साक्षीदार म्हणतो की, फक्त वाळु वाहतुक करताना पाहिले होते. वाळुचे मोजमाप करण्याकरिता महसुल दफ्तरी पत्रव्यवहार केल्याबाबत मी सांगु शकत नाही. हे म्हणणे खरे नाही की, घटनास्थळाचा चतुःसिमा सांगत शकत नाही. साक्षीदार म्हणतो की, पुर्व–पश्चिम सोलापुर–पुणे हायवे, उत्तरेस– मोकळी जागा व त्यापलीकडे पुणे–सोलापुर रोड आणि दक्षिणेस शिवनेरी हॉटेल. घटनास्थळी आरोपीकडे त्याने ती वाळु कुठून आणली याबाबत चौकशी केली होती, परंतु त्याने उडवाउडवीची उत्तरे दिली. हे म्हणणे खरे नाही की, ट्रकमध्ये वाळु होती आणि ती ३ ब्रास होती हे मी अंदाजे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, अशा प्रकारच्या कारवाई करण्यासाठी वरिष्ठांचा दबाव असतो. हे म्हणणे खरे नाही की, वरिष्ठांच्या सांगण्यावरुन खोटी फिर्याद देऊन आज खोटी साक्ष देत आहे.

**<u>उलटतपास पुर्ण.</u>**
**<u>फेरतपास नाही.</u>**
श्रवणोत्तर स्विकृत.

समक्ष

SHABNAM ANSAR VIRANI
Digitally signed by SHABNAM ANSAR VIRANI
Date: 2025.12.29 15:52:15 +0530

दिनांकः– २९.१२.२०२५

**[ श्रीमती एस. ए. विराणी ]**
न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, दौंड, जि. पुणे.